शिर्डी साईबाबांच्या गहनगूढ जीवनाचा रसाळ वेध घेणारी महाकादंबरी

# साई

विनोद गायकवाड

रिया पब्लिकेशन्स्

**साई : प्रा. विनोद गायकवाड**

© **प्रा. विनोद गायकवाड**
'साईसाक्षी' प्लॉट क्र. २७, तिसरा क्रॉस,
वैभवनगर, बेळगाव.
मोबा.९९४५०१५३६४

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
९६८९९०९८९८

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ४२०/-

प्रिय बाबा,
तुमच्याविषयी 'हेमाडपंत' लिहितात...
'बाबांच्या चेहऱ्याकडे पाहात असताना
तहान-भूक नाहीशी होते !
त्यापुढे इतर सुखांचा काय पाड !!
कर्म-धर्म, शास्त्र-पुराण, योगयाग, अनुष्ठान, तीर्थयात्रा, तपाचरण
हे सर्व मला साईंच्या चरणांच्या ठिकाणी आहेत !!'
माझेही अनुभव आणि भावना याच आहेत !
ही कादंबरी म्हणजे तुमच्या विराट कर्तृत्वाचा एक किरण आहे.
हा किरण प्रथम तुमच्याच चरणी श्रद्धापूर्वक !
त्याचबरोबर...
तुमची कथा शब्दांतून शाश्वत करणारे
हेमाडपंत : श्री. गोविंद रघुनाथ दाभोलकर
आणि
दासगणू : श्री. गणपत दत्तात्रय सहस्त्रबुद्धे
या अभिजात साहित्यिकांना
कृतज्ञतापूर्वक !

**– प्रा. विनोद गायकवाड**

।। ॐ साई ।।

# साई शब्द...

आज 'साई' कादंबरी ही श्री शिर्डी साईबाबांचीच कृपा आहे, यात शंका नाही. माझ्या जीवनातील हा आनंदाचा आणि धन्यतेचा क्षण आहे.

एकदा मी बेळगावच्या साई मंदिरात नेहमीप्रमाणे दर्शनासाठी गेलो होतो. मूर्तीपुढे उभा राहिलो, मन बाबांमध्ये गुंतले आणि बाबांचा सुस्पष्ट आदेश झाला – 'माझ्यावर कादंबरी लिही.' मी रोमांचित झालो. उत्साहित झालो. घरी येऊन सौ. स्वातीला हा आदेश सांगितला. ती पटकन म्हणाली, 'खरेच लिहा बाबांवर! तुमची सगळी संकटे दूर होतील.' ती परम साईभक्त आहे. तिच्या तोंडून बाहेर पडलेले हे सहजोद्गार मला महत्त्वाचे वाटले.

आणि मग अभ्यासाला लागलो. बाबांच्यावर जेवढी पुस्तके मिळतील तेवढी सारी जमवली. शिवाय बाबांना गीता, कुराण, उपनिषदे, पतंजलीची योगसूत्रे अशा असंख्य ग्रंथांचे गहन ज्ञान होते. त्यामुळे ओघाने त्यांचेही वाचन झाले. दररोज पंधरा-पंधरा तास अखंड वाचन-लेखन केले. हा सर्व काळ मोठा विचित्र होता. 'साई' लिहितानाचा काळ विलक्षण धुंदीत, आध्यात्मिक अनुभूतीत असा व्यतीत व्हायचा. त्यातून बाहेर पडलो की, असंख्य संकटे जणू वाटच पाहायची. परस्परविरोधी अनुभूतींचा हा काळ होता. जणू बाबा माझी परीक्षा घेत होते. पण मी उत्तीर्ण झालो. कादंबरी लिहून पूर्ण झाली. या दरम्यान मी अनेक चमत्कार अनुभवले आणि बाबांची कृपा पूर्ण असल्याची खात्री झाली.

श्री साईंचे जीवन गहनगूढ आणि विलक्षण रोमांचक ! साई म्हणजे साक्षात ईश्वर! त्यांचे ज्ञान, त्यांचे तत्त्वज्ञान, उपदेशाची पद्धत, जगाचा मालक असूनही धारण केलेली फकिरी वृत्ती, सर्वांना अन्नदान करायचे पण स्वत: भिक्षा मागून खायचे व एकीकडे दादासाहेब खापर्डे, नानासाहेब चांदोरकर, हेमाडपंत, दासगणू अशा असंख्य विद्वानांनाही बुचकळ्यात टाकणारे गूढ बोलायचे तर दुसरीकडे अत्यंत सामान्य लोकांना सहज समजणाऱ्या भाषेत गोष्टी सांगत गहन ज्ञान सोपे करून सांगायचे; श्रद्धा, सबुरी, शांततेचा एकीकडे आग्रह धरायचा आणि दुसरीकडे स्वत:च अत्यंत क्रुद्ध व्हायच; बालकांमध्ये मिसळून गाणी गात नाचायचे, प्रसन्न गप्पा, विनोद करायचे आणि दुसरीकडे प्रचंड वादळाशी झुंजून त्याला शांत करायचे... अशा असंख्य परस्परविरोधी वाटणाऱ्या गोष्टींनी

बाबांचे जीवन अधिकच गूढ बनत जाते. बाबांची अशी व्यक्तिरेखा समजून घेणे खरे तर माझ्या आवाक्यापलीकडचे होते. पण मी बाबांनाच शरण गेलो असल्यामुळे आणि 'माझी कथा मीच लिहितो' असे त्यांचे सांगणे असल्यामुळे मी फक्त त्यांचा 'लेखनिक' बनलो. लेखक नव्हे ! त्यामुळे या कादंबरीला जो प्रचंड प्रतिसाद लाभला त्याचे श्रेय मला नाही. तेही बाबांच्या चरणीच आहे!

बाबांच्या जीवनाची काही वैशिष्ट्ये मला जाणवतात. बाबांनी कोणताही नवा धर्म स्थापन केला नाही आणि कोणत्याही एका प्रचलित धर्माचा प्रसार-प्रचार केला नाही. सर्वच धर्मांना त्यांनी सारखे महत्त्व दिले. ते स्वत: कोणत्या धर्माचे आहेत, हे शेवटपर्यंत सांगितले नाही. अर्थात माझ्या दृष्टीने या प्रश्नाला कसलाच अर्थ नाही. असा प्रश्न निर्माण करणे म्हणजे त्यांचे जीवितकार्य न समजणे होय ! धर्म ही ईश्वराकडे नेणारी शिडी आहे. समुद्राकडे जाणारी ती सरिता आहे. सागर नव्हे !! विशिष्ट भौगोलिक, सामाजिक आणि मानसिक परिस्थितीत हे धर्म निर्माण झाले, वाढले. मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास हाच धर्मतत्त्वांचा ध्यास होता. पण आज धार्मिक अस्मिता ही झगड्याला कारणीभूत होत आहे. धार्मिक अहंकारामुळे माणसामाणसांत दरी निर्माण होऊन मने संकुचित बनत आहेत. मने विशाल व्हावीत, अहंकार नष्ट व्हावा, परस्पर प्रेम, जिव्हाळा निर्माण व्हावा आणि माणूस भौतिकतेसह आध्यात्मिक उन्नती करून सुखी, संपन्न, तृप्त असे निरामय आनंदी जीवन जगावा, ही जी धर्माची आद्य तत्त्वे होती ती आज फलद्रुप होताना दिसत नाहीत. धर्माच्या नावावर धर्मविरोधी वर्तन आपण करतो आहोत. त्यामुळेच कधी नव्हे एवढा आज माणूस अशांत, असंतुष्ट, क्रुद्ध, क्रूर आणि रोगग्रस्त, तणावग्रस्त बनला आहे !

बाबांच्या कार्याचे महत्त्व हे आहे की, त्यांनी धर्मापलीकडे जाऊन 'माणूस' शोधण्याची, पाहण्याची दृष्टी दिली. त्यामुळे आपोआपच धर्मसंकुचितत्व गळून पडले आणि सर्वधर्मसमभावाची व्यापक दृष्टी निर्माण झाली. हिंदू आणि मुस्लिम समाजामध्ये त्यांनी विलक्षण सामंजस्य आणि परस्पर स्नेहभाव निर्माण केला. मशिदीची द्वारकामाई केली. आज याच बंधुत्वाची पुन्हा गरज निर्माण झाली आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते. देशात किंवा जगभरात जो उद्रेकी आणि महाविध्वंसक धर्मसंघर्ष घडतो आहे, तो थांबवून पुन्हा परस्पर सौहार्दाचे, प्रेमाचे आणि परम विश्वासाचे वातावरण निर्माण करावयाचे असेल तर जगभर सर्व भाषांत, प्रत्येक घरात साईबाबांचे तत्त्वज्ञान जायला हवे.'साई' कादंबरीचे प्रयोजनच हे आहे !!

जानेवारी २००७ मध्ये 'साई' प्रसिद्ध झाली आणि वाचकांनी तिचे भरघोस स्वागत केले. मला असंख्य फोन येऊ लागले. असा प्रचंड प्रतिसाद यापूर्वी मी अनुभवला नव्हता. श्रेष्ठ साहित्यिक प्रा. अनंत मनोहर, डॉ. संपतराव जाधव, डॉ. ल.रा. नसिराबादकर, माझे आदरणीय मित्र श्री. उत्तम कांबळे, सोलापूर 'सकाळ'चे संपादक श्री. अरुण खोरे, सहकारमहर्षी मनोहर देसाई, कर्नाटक विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. बाबूराव गायकवाड, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. महादेव देशमुख, अंध कवी चंद्रकांत देशमुखे, जळगावचे डॉ. जयंतराव चौधरी, विजापूरचे श्रीहरी आठल्ये, गुलबर्गा विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुख डॉ. विजया तेलंग, श्रीहरी सहस्त्रबुद्धे, प्राचार्या अरुणा नाईक, कवयित्री मीरा तारळेकर, श्री. मोहन कारेकर, मधू कलंत्री, डॉ. चंद्रकांत वाघमारे, ॲड. अभय पाटील, ॲड. आदिनाथ नरदे, बेंगलोर, डॉ. बुध्याप्पा, डॉ. सरजू काटकर, प्रा. डी.एस. चौगुले, डॉ. सिद्धराम कर्णिक, डॉ. चंद्रशेखर बनसोडे, माझे विद्यार्थी प्रा. मनिषा नेसरकर, प्रा. इराप्पा गुरव, प्रा. सरला देसाई, प्रा. आरती जाधव अशा असंख्य जाणकार रसिकांनी, साईभक्तांनी 'साई' आवडल्याचे आवर्जून कळवले.

कडेगाव (जि. सांगली) येथे 'साई'चे जाहीर वाचन व्हायचे आणि रोज रात्री वाचन संपले की अंध कवी चंद्रकांत देशमुखे आणि त्यांची मित्रमंडळी तत्काळ फोन करून मला प्रतिक्रिया कळवीत. सोलापूरच्या कवयित्री सौ. कविता नील-मुरूमकर याही वाचतानाच त्यांना जे जे वाटे ते सांगत. कादंबरी वाचून संपल्यावर त्या म्हणाल्या,'साई' इतकी उत्तम कादंबरी आहे की तुमच्या आयुष्यातलं हे सर्वोत्तम लेखन आहे. त्यामुळे यापुढे आणखी काही लिहिण्याची गरज नाही. मांजरी येथे माझे वडील श्री. मनोहर गायकवाड यांनी वारकऱ्यांसमवेत 'साई'चे जाहीर वाचन केले. अनेक ठिकाणी हा उपक्रम सुरू आहे.

माझे Friend, Philosopher and Guide प्रा. अरविंद मजली आणि सौ. सुमन मजली हे जोडपे तर संपूर्णपणे साई समर्पित आहे. 'साई'च्या प्रती सर्व जाणकार व अत्यंत निष्ठावंत भक्तांकडे त्यांनी पोहोचविल्या. 'साई' कादंबरीचा प्रसार हेच त्यांच्या जीवनाचे आता ध्येय आहे.

कागल येथील साई मंदिर ट्रस्टचे संस्थापक श्री. जयंतराव कौलवकर (काका) आणि सौ. स्मिता कौलवकर (माई) हे जोडपेही संपूर्णपणे अक्षरश: तन-मन-धनाने साईचरणी समर्पित आहे. साई अनुग्रहित आहे. 'साई'चे अखंड आणि वारंवार त्यांचे वाचन सुरू असते. त्यांनी 'पश्चिम शिर्डी' कागल येथे निर्माण केली. गोवा येथे 'दक्षिण शिर्डी' निर्माण करणारे, श्री साईबाबा सेवा मंडळ ट्रस्टचे (अवेदी-बोरी, फोंडा गोवा) अध्यक्ष श्री. उमेश नाईक, सचिव श्री. जीवनदास व्ही. बोरकर, खजिनदार श्री. अमर एस. नाईक-शिरोडकर आणि सर्व विश्वस्त यांनी संपूर्ण गोवा राज्यात 'साई' वितरीत करण्याचे मनावर घेतले आहे आणि ते कार्यरत आहेत. निपाणी येथील 'साई' मंदिराचे सर्व ट्रस्टी तसेच बेळगाव

येथील ॐ श्री साई समाज (साई मंदिर, टिळकवाडी)चे अध्यक्ष डॉ. एम.एस. शेषगिरी, उपाध्यक्ष श्री. विजय शानभाग, सचिव ॲड. मोहनराव मोहिते व सर्व सदस्य यांचाही 'साई' प्रसारामध्ये मोठा सहभाग आहे.

'साई' वाचून त्यावर समीक्षण, परीक्षण आणि अभिप्रायही अनेकांनी आवर्जून लिहिले, त्यामध्ये भावना भार्गवे, प्रा. संध्या देशपांडे, श्री. पुरुषोत्तम हुलजी, प्रा. रश्मी सामजी, सौ. अरुंधती सुखटणकर, सौ. सविता कोसंदल, सौ. सुषमा श्रीधरकुंद्री यांचा आवर्जून उल्लेख करणे मला जरूर वाटते.

'साई'चे प्रकाशन शिर्डीमध्येच खुद्द बाबांच्या समाधी मंदिरात महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. छगन भुजबळ यांच्या हस्ते झाले, तेव्हा शिर्डी संस्थानचे अध्यक्ष आमदार जयंत ससाणेसाहेब म्हणाले होते की, 'साई' सर्व भाषांत जायला हवी.' ही व्यवस्थाही श्री बाबांनीच केली. अनेकांना दृष्टान्त देऊन त्यांनी भाषांतराला प्रवृत्त केले. कन्नड अनुवाद प्राचार्य चंद्रकांत पोकळे यांनी पूर्ण केला आहे. श्री.एस.पी. संपगावकर हे इंग्रजीमध्ये, श्री. कल्याणराव देशपांडे हे हिंदीमध्ये तर श्री. पी.आर. राजाराम हे तामीळ भाषेत अनुवाद करीत आहेत. लवकरच आणखीही भाषांमध्ये हे अनुवाद होतील.

आपण कशासाठी जगायचे, या प्रश्नाचे उत्तर 'साई' लिहिल्यानंतर मला सापडले. यापुढचे सारे आयुष्यच 'साई कथा, विचार, तत्त्वज्ञान यांचा सर्व भाषांमध्ये जगभर प्रचार करण्यासाठी, साईभक्तांचा विशाल असा 'जागतिक साई समाज' निर्माण करण्यासाठी व्यतीत करायचे, हे ते उत्तर आहे. या उपक्रमात आपण सर्व साईभक्त निश्चितच सामील व्हाल, असा विश्वास आहे. कारण तुमच्या सहकार्यानेच हे काम पुरे होणार आहे !

सदरच्या 'साई'साठी प्रा. अरविंद मजली तसेच मा. मुकुंदराव गोरेसाहेब, श्री. पंपापती, श्री. करजगी, श्रीमती पै मॅडम या स्टेट बँक ऑफ इंडियामधील अधिकाऱ्यांचे मोठे सहकार्य लाभले आहे. माझे मित्र श्री. आर.के. ओऊळकर, श्री. रवी हुंदरे आणि सौ. शांता बाळासाहेब मुचंडी यांच्यासह अनेकांचे साहाय्य झाले आहे. त्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करून थांबतो.

**– प्रा. विनोद गायकवाड**

# साई

**भाग : १**

अपार साईंच्या अपूर्व कथा ।
शांतिदायक भवद्वार्ता ।
श्रोतयां देतील श्रवणोल्हासता ।
चित्तस्थिरता निजभक्ता।।

**'श्रीसाईसच्चरित'**

# एक

जेवण उरकून चांदभाई उठले. दरवाजातून घराबाहेर आले आणि ढेकर दिला. सूर्य डोक्यावर तळपत होता. ऊन रणरणत होते. अंगणातल्या लिंबाची सावली त्यांना खुणावू लागली. आतमध्ये त्यांनी पत्नीला हाक मारली,

''ये... सुनी क्या...''

''जी?''

''एक पोता दे... जरा पडतो सावलीला.'' आभाळाकडे बघत ते म्हणाले.

''जी...लायी!''

पोते आणण्यासाठी त्यांची पत्नी आत वळली आणि दोन क्षणांतच पोत्यासह बाहेर आली. त्याच क्षणी चांदभाई काही विचार करून म्हणाले, ''नको. रख जा अंदर!''

''क्यो जी? नई सोते क्या?'' काहीशी आश्चर्यचकित होऊन तिने प्रश्न केला.

''नही!''

''क्यो?''

''प्यारी कहाँ होगी? मिलेगी क्या?''

त्यांच्या पत्नीने कपाळाला आठ्या घातल्या. पुन्हा म्हणाली, ''प्यारी... ऐसी कैसी मिलेगी?... प्यारीला हरवून तर दोन महिने झाले. तिचा नाद सोडा आणि लिंबाच्या सावलीला झोपा जरा..जाओऽ'

प्यारी ही चांदभाईची लाडकी घोडी होती. खूप उंच, काळ्या-पांढऱ्या रंगाची, भरघोस आयाळीची प्यारी अतिशय देखणी आणि चपळ होती. चांदभाईंना ती कधीच 'जनावर' वाटली नाही, इतकी ती त्यांच्या भावभावनांशी निगडित होती.

चांदभाई हे 'धूप' गावचे पाटील होते. साऱ्या गावाचा कारभार त्यांना बघावा लागे. त्यानिमित्ताने त्यांना सगळीकडे फिरावे लागे. ते प्यारीवर खोगीर चढवून, त्यावर बसून प्रवास करीत.

दोन महिन्यांपूर्वी ते असेच औरंगाबादला निघाले होते. वाटेत प्यारीला चरायला सोडले आणि ते विश्रांतीसाठी एका शिळेवर बसले. पाणी प्याले. प्यारी चरत चरत झाडाझुडपामध्ये घुसली आणि दिसेनाशी झाली. पण हे नेहमीचेच होते. चांदभाईंची विश्रांती संपली की, ते तिला साद घालीत आणि प्यारी डौलदारपणे पदन्यास करत खिंकाळत त्यांच्यासमोर येऊन थांबे ! तिला मायेने थोपटत ते तिच्यावर स्वार होत.